धनंजय पंडितराव मुंडे

मंत्री
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य,
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

दि. 21/12/2020

प्रिय श्री.अरविंदजी,
सप्रेम नमस्कार

नुकत्याच झालेल्या 'चला हवा येवू द्या' या कार्यक्रमातील आपले एक पत्र वाचण्यात आले. त्यातली रेघ ना रेघ, शब्द ना शब्द मनाला स्पर्श करून अंगावर काटा आणत होता; माझ्याही वडिलांनी एकेकाळी ऊस तोडलेला आहे. एक ऊसतोड कामगार ते एका कारखान्याचे संचालक हा त्यांचा प्रवास, ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांना सोडवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न मला नेहमी प्रेरणा देतात. कदाचित त्यांच्याच या कामाचा वारसा मला लाभला असावा.

तुमच्या पत्रात लिहिल्याप्रमाणे आमच्या जिल्ह्यात गावोगावचे लोक उसतोडणीला जातात, त्यामुळं त्या ऊसतोड करणाऱ्या मजुरांची, गोड साखरेची कडू कहाणी मला तोंडपाठ आहे. त्यांच्या प्रत्येक अडचणीची जाण आणि वेदनेची जाणीव मला आहे. तुमच्या पत्राच्या माध्यमातून पुन्हा एकदा त्या हृदयस्पर्शी भावना आणि वेदना यांची जाणीव करून दिलीत, त्याबद्दल तुमचे आभार.

राज्यात आमचा पक्ष सत्तेत आला, जनतेच्या आशीर्वादाने मी राज्याचा मंत्री झालो, तेव्हा याच जाणिवेतून मुख्यमंत्र्यांना ऊसतोड करणाऱ्या कष्टकऱ्यांचे बंद पडलेलं महामंडळ मी माझ्या खात्याकडे मागून घेतलं.

काबाड कष्ट करणाऱ्या उसतोड्या बापाला पुढं आपल्या लेकरांच्या नशिबी हीच पाचट आणि हाच कोयता हातात येऊ नये असंच वाटतं, म्हणूनच लेकराला शिकवण्याच्या, मोठं करण्याचा जिद्दीने आई-बाप अधिक नेटाने ऊस तोडतात. उसाच्या बुडावर घातलेला कोयत्याचा वार नशिबाच्या रेषा पुसायला कमी पडतो बऱ्याचदा. म्हणूनच स्व. मुंडे साहेबांच्या नावाने उभारलेलं महामंडळ मी माझ्याकडं घेतलंय. या महामंडळाच्या माध्यमातून किमान त्या लेकरांचं तरी भविष्य मला सुधारायचय, त्यांच्या उषा पायथ्याला असलेली पाचट सारून हातात पुस्तक द्यायचंय! ज्या तालुक्यात माझ्या उसतोडयांची संख्या जास्त, असे पाच तालुके निवडून तिथं सर्व सोयीयुक्त पाच निवासी शाळा बांधायचा संकल्प मी केलाय!

हे खरंय की राबणाऱ्या हाता पायांवर अपघातांचे आघातही त्यांना बऱ्याचदा सहन करावे लागतात. या आघातांमध्ये कुणाचा हात जातो तर कुणाचा पाय, काहींच्या तर जीवावरही बेतलेलं तुम्ही आम्ही पाहिलंय! म्हणूनच या सगळ्या माझ्या उसतोड्या बांधवांना मला एक विशिष्ट विमा कवच द्यायचंय. त्याची तयारी मी सुरू केलीय. येत्या काही दिवसातच हा आरोग्य विमा सरसकट सगळ्या ऊसतोडणी कामगारांना लागू होईल.

ऊसतोडणी करणाऱ्या माणसांसह त्यांच्या जनावरांना सुद्धा विमा कवच देण्याचा निर्धार करून आम्ही काम करतोय.

कोरोनामुळे सगळा देश बंद झाला तेव्हा या लोकांचे झालेले हाल मन हेलावणारे होते. कारखान्यांच्या चिमण्या चालू की बंद याचा विचार न करता सरकारच्या माध्यमातून लगबगीने निर्णय घेऊन या सगळ्यांना आपापल्या घरी सुरक्षित पोचवता आलं, या गोष्टीचं एक समाधान आहे.

: कार्यालय :

मुंबई कार्यालय:-
दालन क्र. १०२ (मुख्य इमारत),
पहिला मजला, मंत्रालय, मुंबई - ३२.
दुरध्वनी क्र.: ०२२-२२८८६२९३
०२२-२२८८६०२५

मुंबई निवास:-
'चित्रकुट' बंगला, रतीलाल ठक्कर मार्ग, मलबार हिल
पोलीस स्टेशन समोर, मलबार हिल, मुंबई-४००००६.
दुरध्वनी क्र.: ०२२-२३६७ ६९५१
०२२-२३६८ ५५०१

परळी वैजनाथ :-
जगमित्र कार्यालय, सिंचन भवन समोर,
अंबाजोगाई रोड, परळी, वैजनाथ, जि. बीड
दुरध्वनी क्र.: ०२४४६ / २२५७७७
२२३३७७

Email: dhananjay.munde@gov.in Dhananjay Munde @dhananjay_munde Dhananjay Munde

धनंजय पंडितराव मुंडे

सत्यमेव जयते

मंत्री
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य,
महाराष्ट्र शासन

दि. / /

पण अशी कोणतीही आपत्ती आली तर सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणार नाही, इतर कष्टकरी, कामगार वर्गाप्रमाणे न्याय मागण्यासाठी हक्क राहावा यासाठी येत्या अर्थ संकल्पा पर्यंत ऊसतोड मजुरांसाठी स्वतंत्र कायदा अस्तित्वात आणायचा निश्चय मी केलाय, त्या दृष्टीनं कामही सुरू केलय.

गरिबी आणि बेरोजगारीच्या समस्येने मोठ्या प्रमाणात ग्रासलेल्या या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने निर्माण केलेल्या संविधानात प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा, सामाजिक समतेचा, आपल्या काबाड कष्टाचा योग्य मोबदला मिळवण्याचा, न्यायासाठी लढण्याचा अधिकार दिलाय, म्हणूनच असंघटित असलेल्या या माझ्या उसतोड्या भावंडाना सामाजिक सुरक्षा आणि स्थिरता देणारा कायदा मला अस्तित्वात आणायचाय!

दिवस ना रात्र, वेळ ना काळ असा कामजुलूम असलेल्या माझ्या माता भगिनींना आपल्या पोटच्या चिमुकल्या लेकरांना पाचटीत ठेऊन आणि आपल्या अंगी असलेल्या दुखण्या - वेदनांना मनात दाबून ठेऊन दिवस रात्र कष्ट करावे लागतात. याचे त्यांच्या वैयक्तिक आरोग्यावर होणारे परिणाम विचारात घेऊन गरोदर, स्तनदा मातांसाठी, कमी वयात उसाचे ओझे वाहणाऱ्या माझ्या बहिणींसाठी काही विशेष सहाय्य योजना मी आखत आहे.

आर्थिक स्थैर्य, कमीत कमी स्थलांतर तसेच उरलेल्या वेळेत हक्काचे काम मिळावे यासाठीही ठरवून रोजगार हमी सारखे काम या हातांना मिळवून द्यायचा माझा प्रयत्न आहे.

शेवटी एवढंच सांगेन की, कोयता अर्धा असो किंवा एक, कष्टाचा योग्य मोबदला सुरक्षा हा तुमचा अधिकार आहे आणि तो मिळवून देण्यासाठी वेळप्रसंगी कुणाच्या विरोधात जावं लागलं, तरी मी मागेपुढे पाहणारा माणूस नाही.

उसाच्या बुडावर कोयत्याने वार करून साखर गोड करणाऱ्या हातांना योग्य मोबदला, सुरक्षा आणि लेकरांचे उज्वल भविष्य या जबाबदारीसह आर्थिक व सामाजिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी मी शब्दबद्ध आहे असे अभिवचन देतो, आणि लेखनिस विराम देतो. कधी तरी मी ऊसतोड कामगारांसाठी करीत असलेल्या प्रयत्नांची ही बाजू ही आपण मांडाल ही अपेक्षा.

लवकरच भेटू ...! नववर्षाच्या शुभेच्छा.

आपला,

(धनंजय मुंडे)

: कार्यालय :

मुंबई कार्यालय:-
दालन क्र. १०२ (मुख्य इमारत),
पहिला मजला, मंत्रालय, मुंबई - ३२.
दुरध्वनी क्र.: ०२२-२२८८६२९३
०२२-२२८८६०२५

मुंबई निवास:-
'चित्रकुट' बंगला, रतीलाल ठक्कर मार्ग, मलबार हिल
पोलीस स्टेशन समोर, मलबार हिल, मुंबई-४००००६.
दुरध्वनी क्र.: ०२२-२३६७ ६९५१
०२२-२३६८ ५५०१

परळी वैजनाथ :-
जगमित्र कार्यालय, सिंचन भवन समोर,
अंबाजोगाई रोड, परळी, वैजनाथ, जि. बीड,
दुरध्वनी क्र.: ०२४४६ / २२५७७७
२२३३७७

Email: dhananjay.munde@gov.in Dhananjay Munde @dhananjay_munde Dhananjay Munde